International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# दलित आत्मकथनांतील सामाजिकता: एक नवा दृष्टिकोन

**प्रा. हंसराज भांगे[1], प्रा. डॉ. दत्तात्रय केशव गंधारे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी,*

*संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय,*

*संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.*

*[2]संशोधन मार्गदर्शक,*

*अ‍ॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर.*

*Corresponding Author – प्रा. हंसराज भांगे*

**DOI - 10.5281/zenodo.20489513**

**प्रास्ताविक :**

दलित साहित्य हा स्वातंत्र्योत्तर काळातील वाङ्मयीन प्रवाह आहे. परंतु  हि निखळ वाङ्मयीन चळवळ नसून  तिचा सामाजिक परिवर्तनाशी घनिष्ठ संबंध आहे. हे यासाहित्य चळवळीने  दलितांच्या जीवनात प्रचंड उलथापालथ केलेली आहे. कथा,. कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथने या माध्यमातून उपेक्षितांचे जीवन दलित साहित्यातून चित्रित होत असते. दलितांनी दलितांच्या जीवनाबद्दल लिहिलेले वाङ्मय म्हणजे दलित वाङ्मय होय. दलित वाङ्मय हा स्वतंत्र, स्वयंभू असा वाङ्मयप्रकार आहे. त्याची प्रेरणा, स्वरूप, तत्त्वज्ञान व फलश्रुती या सर्व बाबतीत दलित वाङ्मय हे ललित वाङ्मयापेक्षा संपूर्ण निराळे आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून दलित. आत्मकथनांतील सामाजिकतेचा किंबहुना त्यातील समाजविश्वाचा अभ्यास अभिप्रेत आहे. परंतु हा अभ्यास करताना सामाजिक परिप्रेक्ष्यातून करावयाचा आहे. दलित आत्मकथनांनी किंबहुना दलित साहित्याने मराठी साहित्यविश्वात फार मोठे वादळ निर्माण केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) दलित आत्मकथनांचा अभ्यास करणे.

२) दलित आत्मकथनांतील सामाजिकतेचा अभ्यास करणे.

३) दलित आत्मकथनांमागील प्रेरणांचे स्वरूप स्पष्ट करणे.

४) दलित आत्मकथनांतील भाषेचा अभ्यास करणे.

५) दलितातील विविध जातींच्या आत्मकथांचा अभ्यास करणे.

६) वेदना, विद्रोह, नकार याचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे महत्त्व:**

दलित आत्मकथनातील सामाजिकतेचा अभ्यास करताना, दलित साहित्यामागील प्रेरणा स्त्रोतांचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा प्रामुख्याने महत्त्वाची आहे.दलितांना त्यांच्या जीवनातील प्रखर वास्तवाची जाणीव करून देणाऱ्या आणि दलित जातीत जन्माला आलेल्या विद्वान महापुरुषाने अर्थात युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विचार

प्रबोधनातून स्वसमाजाचे आत्मभान जागे केले. किंबहुना पिढ्यानपिढ्या अज्ञानाच्या गर्तेत अडकलेल्या समाजाला सूर्यप्रकाशाची वाट दाखवून दिली. या महापुरुषाचे कार्य हे खऱ्या अर्थाने दलितांच्या जीवनात लोकोत्तर ठरले. सुमारे अडीच हजार वर्षे हा समाज अंधारात चाचपडत होता, या समाजाला बाहेर काढून स्वतःची जाणीव करून देऊन त्यांचा आत्मसन्मान जागृत करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. 'स्व' आणि 'स्वेत्तर समाजाला त्याच्या पारंपारिक मगरमिठीतून बाहेर काढणे हा त्यांचा हेतू होता. डॉ. आंबेडकरांप्रमाणेच बुद्ध, फुले यांच्याही काही प्रेरणांचे अंश या साहित्यात आढळतात. मनोरंजन हे दलित साहित्याचे उद्दिष्टे नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्य क्षेत्रात निर्माण झालेला एक सामर्थ्यवान प्रवाह असे दलित साहित्याचे वर्णन करता येईल. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने जागृत झालेल्या दलित समाजात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. संविधानाची निर्मिती डॉ. आंबेडकरांनी केली. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. बहुजन समाजातील मुलं शिकू लागली. त्यातून त्यांना आत्मजाणीव आली, आत्मभान आले. नव्या जाणिवेने दलित तरुण जीवनाकडे पाहू लागले. स्वतःच्या समाजाची हजारो वर्षांपासून चालू असलेली दुःस्थिती, ती निर्माण होण्याची कारणे याचा ते विचार करू लागले. दलित समाजाला या साऱ्यामुळे प्राप्त झालेल्या नव्या जाणिवेतूनच दलित साहित्याचा जन्म झाला. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. त्यामुळे शिक्षण घेतले पाहिजे याची जाणीव दलितांना झाली. या जागृत दलित आत्मभानाला वर्तमान काळात येणाऱ्या आणि दुःखदायक अनुभवांचे कारण, भारतीय संस्कृती, रूढी, परंपरा, समाजव्यवस्था हे आहे असे जाणवले. असह्य दुःख आणि दारुण मनःस्थिती यांच्या चटक्यांनी पोळून निघालेली ही दलित मने आक्रोश करू लागली. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करू लागली. दलितांचे दुःख आणि विद्रोह यातून दलित साहित्याचा जन्म झाला. म्हणूनच अन्यायी संस्कृती, परंपरा, समाजव्यवस्था यांना दलित साहित्याने नकार दिला आहे. त्यांच्याविरुद्ध त्याने विद्रोह पुकारलेला आहे. त्या साऱ्याचा विध्वंस करून नवे मानवतावादी, समतावादी, विज्ञाननिष्ठ दृष्टीचे जग निर्माण करण्याची त्यांची इच्छा आहे. दलित साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी पत्करलेली आहे. दलित साहित्य हे फुले-आंबेडकरांच्या विचाराला स्वीकारते. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे कोणत्याही नव्या विचारप्रवाहाने आपली परंपरा शोधायची असते. दलित साहित्य हा विचार प्रगत असून प्राचीन भारतातील बुद्धाची परंपरा ही दलित साहित्याची परंपरा आहे. दलित साहित्य हे सामाजिक जाणिवेतून लेखन करते. जातिभेद व अस्पृश्यतेला विरोध करते.

समता, न्याय, बंधुता स्वीकारते. तर डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात की, दलित साहित्य हे मराठी साहित्यापेक्षा पृथगात्म अशा वैचारिक आशयाने युक्त आहे. दलित साहित्यातील कविता, कथा, नाटक, निबंध, आत्मकथनं इत्यादी वाङ्मय प्रकार नव्या जाणिवेने प्रगट झाले आहेत. त्यामुळे त्याचे स्वरूप प्रस्थापित ब्राह्मणी साहित्यापेक्षा, सर्वोच्या अनुभूतीचे संवेदनाविश्व घेऊन प्रकटले आहे. म्हणूनच दलित आत्मकथनातून किंबहुना दलित साहित्यातून विद्रोह प्रकट झाला आहे. मला या ठिकाणी दलित आत्मकथनातील सामाजिकतेचा अभ्यास अभिप्रेत आहे. दया पवारांचे 'बलुतं', लक्ष्मण माने यांचा 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांचा 'उचल्या', विमल मोरे यांचे 'तीन दगडाची चूल', किशोर काळे यांचे 'कोल्हट्याचं पोर', ल. सि. जाधव यांचे 'होरपळ', बाबुराव इंगळे यांचे बेनीतुरेच्या काठावर, अशोक पवारांचे बिराड, अशोक जाधव यांचे

भंगार , नारायण भोसले यांचे देशोधडी वरील निवडक आत्मकथांचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करताना विविध जाती, वर्ण,लिंग, समाज, त्यांची बोली यांचा अभ्यास इथे होणार आहे. सदर संशोधन विषयातून आत्मकथनातील विविध पैलूंचा अभ्यास होणार आहे. खरं तर ही दलित आत्मकथने रूढी, परंपरा, प्रस्थापित समाजव्यवस्था नाकारतात, विज्ञानावादी दृष्टिकोन स्वीकारतात. वरील आत्मकथांतून बोलीचा अभ्यास करता येतो. दलित आत्मकथनांनी मराठी साहित्यविश्व समृद्ध केले आहे. म्हणून आत्मकथनांचा सामाजिक परिप्रेक्ष्यातून अभ्यास महत्त्वाचा ठरतो म्हणूनच हा विषय संशोधनासाठी महत्त्वाचा आहे.

**दलित आत्मकथनांतील सामाजिकता:**

दलित वाङ्मयाकडे केवळ वाचकांचेच नव्हे तर 'साहित्य अकादमी' सारख्या संस्थांना आणि विदेशी भाषिकांनाही लक्ष वेधावे असे वाटण्याइतके यश दलित आत्मकथांनी प्राप्त झाले. त्यामध्ये व्यक्त झालेल्या व्यथा, वेदना एका व्यक्तीच्या असल्या तरी लेखनात त्या व्यक्तीच्या न राहता समाजाच्या बनल्या आहेत. कारण व्यक्ती आणि समाज यांचे नाते अतूट आहे. व्यक्तीला समाजापासून आणि समाजाला व्यक्तीपासून वेगळे करता येत नाही. जसे मुलाला आईपासून आणि आईला मुलापासून वेगळे करता येत नाही. कारण व्यक्ती समाजाचा घटक आहे. ती समाजात वाढते आणि समाजातच मोठी होते. म्हणून सामाजिक संस्कार खूप महत्त्वाचे असतात. दलित आत्मकथने भीषण वास्तव दर्शन घडविणारी, अस्वस्थ करणारी ठरली. स्वातंत्र्योत्तर काळात शिकलेली पिढी नव्या दमाने लिहिती झाली. त्यातून अनेक सामर्थ्यवान आत्मकथने दलित वाङ्मयात आली. गावकुसाबाहेर भोगलेले जीवन बेधडकपणे शब्दांतून मांडत सुटले आहेत. कथा, कादंबऱ्या, कविता आणि नाटके यातून त्यांनी आपला जीवन संघर्ष प्रभावीपणे मांडला आहे. दलित साहित्य हे शोषणव्यवस्थेविरुद्ध आपल्या कलाकृतीतून विद्रोह व्यक्त करीत आहे. अस्पृश्यता, गुलामगिरी, जातिभेद, विषमता, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अन्यायाला मूठमाती देण्यासाठी दलित साहित्यिक शब्दांचा हत्यार म्हणून उपयोग करीत आहेत. ज्या प्रस्थापित व्यवस्थेने दलितांवर अन्याय केला त्या व्यवस्थेला ते लेखनातून आव्हान करत आहेत. त्यामुळे दलित आत्मकथनात किंबहुना दलित साहित्यात आक्रमकता आपल्याला पाहायला मिळते. महार, मांग, ढोर, चांभार, कैकाडी, कोल्हाटी, पारधी, आदिवासी अशा कितीतरी मागासलेल्या जातीतील तरुण आपल्या व्यथा-वेदना, आपला समाज शब्दांकित करत आहेत.

दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि असामान्य महत्त्वाची घटना आहे. हजारो वर्षे मूक राहिलेल्या दलितांच्या अंतःकरणातील व्यथा आणि वेदना, प्रक्षोभ आणि विद्रोह यांना या चळवळीमुळे शब्दरूप मिळाले आहे. त्यातूनच निर्माण झालेल्या दलित साहित्याने एक नवा शक्ती स्रोत मराठी साहित्यात आणून सोडला. दलित आत्मकथनातील जीवन अनुभवविश्व, जाणिवा, वैचारिकता, भाषा, अभिव्यक्ती हे समग्र मराठी साहित्यापेक्षा स्वतंत्र रूप घेऊन आले आहे. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाला व्यक्त होण्यासाठी उद्युक्त करणे ही देखील साहित्याने केलेली ऐतिहासिक महत्त्वाची कामगिरीच मानली पाहिजे. अनेक दलित तरुण मोठ्या उत्साहाने साहित्यनिर्मितीकडे वळताना दिसत आहेत. हजारो वर्षे मूक राहिलेले दलित आता मुक्तपणे बोलू लिहू लागले आहेत. शतकानुशतके उरी बाळगलेले दुःख प्रकट करत आहेत. दलित आत्मकथात दया पवार यांच्या 'बलुतं', लक्ष्मण माने यांच्या 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या' यांसारख्या दलित आत्मकथनातून समाज व्यक्त होताना दिसतो. या

आत्मकथनांनी मराठी साहित्यात नवी भाषा, बोली नवे प्रतिमा प्रतीके दिली. आपला जीवनानुभव व्यक्त करताना दलित लेखकांनी शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी, घरची आर्थिक परिस्थिती आपली समाजव्यवस्था, समाजातील बोली, रूढी, परंपरा, जयंती उत्सव साहित्यातून व्यक्त केले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात श्री. म. माटे, विभावरी शिरूरकर, व्यंकटेश माडगुळकर वगैरे लेखकांनी दलित जीवनाची चित्रे आपल्या वा यात सादर केलीत. परंतु जे जीवनानुभव साहित्यातून अस्सलपणे यायला हवा तो येताना दिसत नाही. म्हणून दलित लेखक डॉ. आंबेडकरांच्या युगप्रवर्तक वाणीला साक्ष ठेवून आपले दुःख शब्दातीत केले आहेत. म्हणून दलित आत्मकथनातील सामाजिकता, त्यातील भीषण वास्तव हृदयाला भिडले, कारण दलित वाङ्मयामध्ये दलित आत्मकथांची वादळी चर्चा झाली. दलित आत्मकथांमध्ये व्यक्त झालेल्या दलित अनुभवांना वाचकांची प्रचंड पसंती आणि सहानुभूती मिळाली. या आत्मकथांचा नायक हा बेडर न डगमगणारा आणि असंख्य दुःखांना लीलया पेलणारा होता. हा नायक परिस्थितीशरण नव्हता.

तो प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत पुढे जात होता. बलाढ्य व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या एका सर्वसामान्य माणसाची ही यशोगाथा होती. मराठी वाचकांना या कथा वाचून जिद्दीने जगण्याची प्रेरणा मिळाली. दलित लेखकांना आपले भोगलेले जीवन व्यक्त करायचे होते. त्याचबरोबर आपल्या समाजावर होणारा अन्याय-अत्याचार समोर मांडायचा होता. आपली व्यथा-वेदना समाजापुढे मांडायची होती. आपल्या समस्यांकडे समाजाचे लक्ष वेधायचे होते. म्हणून आत्मकथने कवितेसारखीच आक्रमकता प्रकट करतात. किंबहुना आपला विद्रोह व्यक्त करतात. ज्या व्यवस्थेने वर्षानुवर्षे दलितांना गुलामगिरीत ठेवले त्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धची चीड यातून व्यक्त होते.

**निष्कर्ष :**

दलित आत्मकथांचा अभ्यास करताना दलित लेखकांनी आपला जीवनानुभव प्रभावीपणे प्रकट केला आहे. हा अनुभव व्यक्त करताना ते शब्द शस्त्रासारखे वापरताना दिसतात. एका अर्थाने ती व्यक्तीची आत्मकथा असली तरी ती संपूर्ण समाजाची कथा होताना दिसते. ज्या प्रस्थापित व्यवस्थेने दलितांवर अन्याय अत्याचार केला त्याविरुद्धचा हा बंड आहे. वेगवेगळ्या जातीतील तरुण शिक्षणाने जेव्हा शहाणे बनतात, आत्मजागृती येते, तेव्हा ते आपला अनुभव ठसठशीतपणे मांडताना दिसतात. म्हणून दलित आत्मकथने वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात. ही आत्मकथने गावकुसाबाहेरचे जीवन स्पष्टपणे मांडतात. म्हणूनच त्यांच्या शब्दांना तलवारीची धार आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास दलित आत्मकथांमधून व्यक्त होणारा जीवनानुभव हा जिवंत अनुभव आहे. आपल्या वाट्याला आलेल्या व्यथा वेदना, आणि ज्या व्यवस्थेने या वेदना लादल्या त्याविरुद्ध दलित लेखक आवाज उठवताना दिसतात. म्हणून ही आत्मकथने वाचकाची सहानुभूती मिळवतात. काल्पनिकतेला इथे वाव नाही. किंबहुना दलित लेखकाचा पिंड नाही. म्हणूनच दलित आत्मकथनात वेदना, विद्रोह आणि नकार ठसठशीतपणे भरला आहे.

**समारोप:**

दलित आत्मकथांचा सामाजिक अभ्यास करताना असे जाणवते की, या आत्मकथांमधील जीवनानुभव जिवंत आहे. कारण साहित्य व समाज यांचे अतूट नाते आहे. साहित्याचे कमळ समाजाच्या तलावातच उगवते आणि तिथेच सुगंध देण्यात धन्यता मानते. व्यक्ती समाजाचा प्रमुख घटक आहे. व्यक्ती जेव्हा आपला अनुभव शब्दांतून मांडते, तेव्हा ते अनुभव व्यक्तीचे न राहता समाजाचे बनतात. म्हणून दलित लेखकांनी व्यक्त केलेला अनुभव, आपल्या वाट्याला

आलेले दुःख, अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, विषमता ही आत्मकथनांतून व्यक्त होते. गावकुसाबाहेरचे जगणे दलितांच्या वाट्याला आल्याने ते मांडताना त्यांच्यात बेडर वृत्ती दिसते. ही दलित आत्मकथने हजारो वर्षांच्या दलितांच्या जगण्याचा दस्तऐवज आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

**संदर्भ :**

१) दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा - डॉ. मनोहर जाधव
२) दलित आत्मचरित्रे साहित्य आणि समाज - डॉ. रमेश धोंगडे
३) दलित आत्मकथा एक आकलन - डॉ. शरणकुमार लिंबाळे
४) दलित साहित्य वेदना व विद्रोह - डॉ. भालचंद्र फडके